# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ 57/2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–22112017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

1485
23/11/17

## :वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

भिवंडी शहरात दि. ०१/१२/२०१७ रोजी ईद–ए–मिलाद सणा निमित्त मुस्लिम बांधवांतर्फे भव्य मिरवणुक काढण्यात येणार असल्याने मिरवणुकीच्या मार्गावर व परिसरातील वाहतुक सुनिश्चित रहावी या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७.०९.१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मी अमित का.काळे, ठाणे पोलीस आयुक्तालयातील वाहतूक शाखेचा पोलीस उप आयुक्त म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

१) वाडा बाजुकडुन नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व वाहनांना **पारोलफाटा (नदीनाका)** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची हलकी वाहने कांबा रोड काटई खाडीपार या पर्यायी मार्गाने अजयनगर पर्यंत येवुन इच्छित स्थळी जातील व जड वाहने अंबाडी नाका येथुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी. बसेससह **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा जकात नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :–(अ) सदरची सर्व प्रकारची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवुन पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इछीत स्थळी जातील.

(ब) तसेच एस.टी. बसेस या आपले प्रवाशी चाविंद्रा जकातनाका या ठिकाणी उतरवतील व तेथुनच प्रवाशी घेवुन बस वळवुन इच्छित स्थळी जातील.

३) ठाणे व कल्याण बाजूने जुना ठाणे आग्रा रोडने वाडा बाजुकडे व चाविंद्रामार्गे नाशिककडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **बागेफिरदोस मस्जिद पेट्रोलपंप** या ठिकाणी **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :–सदरची वाहने बागेफिरदोस पेट्रोलपंप येथे उजवीकडे वळण घेवुन नागांव रोडने इच्छित स्थळी जातील.

४) कॉटरगेट मस्जिद – रामभवन हॉटेल– चॉदतारा मस्जिद, बुबेरे हॉटेल – पटेल मस्जिद उजव्या बाजुने पांजरपोल चौक मार्गे उजव्या बाजुस वळुन पंडीत जवाहरलाल चौक (वंजारपट्टी नाका) – ममता हॉस्पिटलच्या बाजुने डावीकडे – मामा भांजा दर्गा पर्यंत या मिरवणुकीच्या मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजुस सर्व प्रकारची वाहन उभी करण्यास मनाई **(No parking)** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना ही ईद–ए–मिलाद च्या दिवशी म्हणजे **दिनांक ०१/१२/२०१७ रोजी दुपारी १४:०० ते २२:०० वा.** जे पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरच्या अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर
मा.आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.
मा.पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामिण.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी,ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन,ठाणे / भिवंडी /कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२, भिवंडी व विशेष शाखा,ठाणे
प्रभारी अधिकारी, पोलीस नियंत्रण कक्ष,ठाणे व भिवंडी

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ भिवंडी वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, भिवंडी/नारपोली/कोनगांव वाहतूक शाखा.
अधिसुचनेच्या अंमलबजावणीसाठी सुयोग्य दिशा दर्शक फलकांची भि.नि.शहर मनपा च्या संबंधीत अधिकाऱ्याकडून पुर्तता करून घ्यावी.